
ebook
'स्वरभास्कर'
- पं. भीमसेनजी जोशी
लेखक - अनंत पावसकर

# ‘ई-साहित्य प्रतिष्ठान’

सादर करीत आहे.

## अनंत पावसकर

लिखित

# ‘स्वरभास्कर’ –

## ‘भारतरत्न’ - पं. भीमसेनजी जोशी



**© - अनंत पावसकर (ज्येष्ठ पत्रकार आणि संगीत संयोजक)**

anantpavaskar@gmail.com (९८२००२२४१७)

हजारो दर्जेदार मराठी ई-पुस्तके!

फक्त ‘एकच’ क्लिक ..... आणि ई-पुस्तक हजर

**For all ‘E-Sahitya’ E-Books.. Visit/Log on https://www.esahity.com**

(पुस्तक वाचण्यासाठी पुस्तकाच्या कव्हरवर **एक** क्लिक करा- एक मिनिट थांबा- बस्स)

तुमच्या आवडीची पन्नास पुस्तके डाऊनलोड करून मोबाईलवर ठेवा. आरामात वाचा. लोकांनाही फॉरवर्डा. चकटफू !

♥ लेखकाविषयी थोडेसे : ♥

अनंत पावसकर, (ज्येष्ठ सिने पत्रकार आणि माजी ध्वनिमुद्रण अधिकारी)

(जन्म. १२ नोव्हेंबर १९५९ मुंबई)

अनंत पावसकर, हे खऱ्या अर्थाने हिंदी-मराठी गाण्यांमध्ये आकंठ बुडालेले व्यक्तिमत्त्व. ज्यावेळी एखाद्या गाण्याचे, त्याच्या शब्दसुरांचे, संगीताचे, गायकीचे, गाण्याच्या पार्श्वभूमीचे, ध्वनिमुद्रणाचे, गायक-गायिकांच्या व्यक्तिमत्त्वाचे त्यांना भावलेले सौंदर्य ते उलगडून दाखवतात त्यावेळी त्या गाण्यात दडलेल्या सौंदर्याच्या अनुभूतीचा आस्वाद रसिकांनाही नव्याने भावतो. १९९४ ते २०००.. प्रत्येक शनिवारी (सलग सात वर्षे) दै. सामनाच्या फुलोरा पुरवणीमधील आठवणीतली गाणी या लोकप्रिय सदरामुळे वाचकांच्या परिचयाचं एक नाव. आज दिनांक, साप्ताहिक श्री, वृत्तमानस, लोकप्रभा, उत्सव पुरवणी अशा अनेक वृत्तपत्रे, साप्ताहिकात संगीत विषयक लिखाण करणारे अनंत पावसकर हे व्हीनस या मातब्बर म्युझिक कंपनीत अनेक वर्षे ध्वनिमुद्रण अधिकारी म्हणून कार्यरत होते. या काळात कंपनीतर्फे व कंपनीच्या शेकडो अल्बममध्ये त्यांचा पर्यवेक्षक म्हणून सहभाग राहीला आहे. कंपनीच्या अद्ययावत स्टुडिओत विविध निर्मात्यांच्या व संगीतकारांच्या शेकडो हिंदी चित्रपटाची गाणी, पार्श्वसंगीत होताना पाहायचं भाग्य लाभलं, परिचय झाला हे विशेष. ज्येष्ठ वादक, संयोजक यांच्यासोबत गप्पाच्या ओघात एकेक गाण्याची आठवण दृग्गोचर होऊ लागताच यातूनच ते आठवणीतली गाणी हे सदर लिहायला उद्‌युक्त झाले. (बाळासाहेब ठाकरे यांच्या निवासस्थानी पुस्तकांचे प्रकाशन झाले व अनेक वृत्तवाहिन्यांनी त्याची दखल घेतली होती.) आपल्या कव्हर स्टोरींसाठी ते ज्येष्ठ गायक, गायिका यांना प्रत्यक्ष भेटून मुलाखती घेत असत. सुमारे चौदा वर्षे संगीतक्षेत्रापासून दूर असणा-या सुमनताई कल्याणपूर यांची मुलाखत घेत "ते सूर ऐकता" (संगीत : शांक-नील) द्वारे त्यांना संगीत क्षेत्रात पुन्हा एकदा लाईम-लाईट मध्ये आणण्याचं श्रेय त्यांच्याकडे जातं. (कवि प्रा. प्रवीण दवणे यांच्याकडे खूप आठवणी आहेत).

इतर अनेक दिवाळी अंकात संगीतविषयक लिखाण करताना, ऑडिओ कॅसेट स्वरूपातही दिवाळी अंक असावा.. ही संकल्पना गुलमोहर नावाने प्रत्यक्षात आली. (निवेदन प्रदीपजी भिडे). व्हीनसतर्फे अनेक मराठी नाटके प्रथम व्हीसीडीवर आणण्याचं श्रेय अनंत पावसकरांकडे जातं. यात विजय कदम, विनय लाड, सविता मालपेकर, प्रशांत दामले या बालमित्रांची विशेष मदत झाली होती. साईबाबांच्या शिर्डीत १९९९ पासून २००७ पर्यंत ऑडिओ, व्हिडिओ असे सुमारे २५० विविध अल्बम्स बनविण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. हे अल्बम आजही सुप्रसिद्ध आहेत.

मराठीतील पहिलं ई-बुक बनविण्याचा मान त्यांच्याकडे जातो. यासाठी त्यांना ज्येष्ठ साहित्यिक शिरीष कणेकरजी यांच्या उपस्थितीत आशीर्वाद पुरस्काराने गौरविण्यात आले होते. आज त्यांची आठवणीतली गाणी, आपली आवड, लिजेंडस् ७७७७, कराओके क्लब या चार ई-बुक्ससह इतर अनेक ई-बुक्स सध्या सर्वत्र व्हायरल होत आहेत हे विशेष. आज आपल्या समाधानी निवृत्त जीवनात ते म्युझिक प्लॅनेट ही स्वतःची संगीत अकादमी समर्थपणे सांभाळत आहेत. आपल्यासारखाच एक सर्वसामान्य रसिक, आपल्या संगीताचं वेड लेखनातून तसेच विविध संकल्पना राबवून लोकांपुढे आणायची सतत धडपड करतो म्हणून हा उल्लेख. अनंत पावसकर यांना हार्दिक शुभेच्छा.

(#संजीव_वेलणकर पुणे. - ९४२२३०१७३३)

# ‘स्वरभास्कर’
## - पं. भीमसेनजी जोशी

★ लेखक : अनंत पावसकर



शब्द!.. कधी तारेवरून चालल्यासारखे.. तोल सांभाळून चालणारे.. कधी उपमा, उत्प्रेक्षांच्या अलंकारांनी नटलेले.. तर कधी कधी जडजंबाल होऊन विटलेले.. शब्द.. शब्द..!! साबणाच्या बुडबुड्यात फक्त प्रतिमेची इंद्रधनुषी छटा दिसते.. आभास निर्मिते.. पकडू पाहिलं तर बुडबुडा फट्‌कन.. तसंच शब्दांचे! काही काही प्रतिमांना शब्दांच्या कोंदणात नाही येत कोंडता.. स्वरभास्कर पं. भीमसेनजी जोशी !!.. स्वरांचे जादूगार !.. की स्वतःच्या स्वरांच्या हिंदोळ्यावर स्वतःच झुलणारा झुलवा. पण कशाला काढायचा शब्दांचा कीस? स्वयंप्रकाशी सूर्याची करून द्यावी लागते का ओळख?.. तसेच आपले पं. भीमसेनजी.. सूर्यमंडळालाही भेदणारे.. स्वरमंडळ लीलया खेळवणारे. नकोत तुम्हाला कोंदण!.. नको सत्कार!.. कारण तुम्ही आम्हां रसिकांच्या मनाच्या देव्हाऱ्यात कायमच विराजमान आहात.

पं. भीमसेनजींच्या आवाजाशी आपली, आपल्या लहानपणापासूनच जान-पहचान होती हो, पण ती काय चीज आहे हे मला उमगायला बरीच वर्षे खर्ची पडली. १९९३साल होतं ते. कॅसेटस्‌चा जमाना होता तो. ‘व्हीनस’

या मातब्बर म्युझिक कंपनीत ध्वनिमुद्रण अधिकारी म्हणून मी नुकतीच सूत्रे हाती घेतलेली. आषाढीला पंढरपुरात लाखो भाविक येत असल्याने मे महिन्यातच मी अभ्यासासाठी मुद्दाम आठवड्याभराची टूर करायचं ठरविलं. तिथे जाताच लक्षात आलं की, एच.एम.व्ही. कंपनीच्या अमुकच अल्बम्सची चलती आहे. नवं करायला वाव होता. संधी होती. आपण चांगले अल्बम्स बनविले तर खचितच उत्तम प्रतिसाद मिळणार. मान्यवर गायकांना घेऊन दोन सणसणीत प्रॉजेक्ट्स् करून मैदान मारायचं अशा विचारात मुंबईला परतलो. अगदी वरच्या वर्तुळातल्या दिग्गजांकडे जावं तर पं. भीमसेनजी, पं. जितेंद्र अभिषेकीजी, लतादीदी, आशाताई ही नावं फारच मोठी. म्हणजे बजेटही अव्वाच्या सव्वा होणार. (खरंतर त्यांच्याकडे जायची हिम्मतच होईना.) पहिलं गाठलं ते परममित्र पं. सुरेश वाडकरजींना. ‘ओंकार स्वरूपा’ ने यशाची शिखरे पादाक्रांत केलेली असल्याने त्यांनी नव्या अल्बमचा प्रस्ताव मंजूर केला. आता मित्रवर्य पं. अजितकुमार कडकडेंना भेटलो. ‘देवाचिये व्दारी’ ही त्यांची अभंगांची पहिलीच कॅसेट तुफान लोकप्रिय झालेली. त्यांनीही नवं काही तरी करण्याची मनोमन इच्छा असल्याचं सांगत अनुमोदन दिलं. झालं! आखणी झाली. ‘पंढरीनाथा पांडुरंगा’, ‘पंढरीचा राणा’ अशा दोन अल्बम्सची निर्मिती समाधानकारक झाली. व्हायब्रेशन्स, पुणे (आता त्यांची स्वतःची ‘फाऊन्टन म्युझिक कंपनी’ आहे) यांनी पंढरपुरातल्या वितरणाची जबाबदारी खांद्यावर घेऊन चक्क हजारो कॅसेटस् एका दमात संपवल्या. मालक खूश! आम्हा संबंधितांना ‘प्लॅटिनम-डिस्क’ देऊन गौरविण्यात आलं. ‘इतका चांगला प्रतिसाद असेल तर जुन्या गाजलेल्या अभंगांचं व्हर्शन्स का नाही करत! बाबुजी है.. पं. भीमसेनजी है वगैरे वगैरे!’ इति मालक. मी तीन-ताड उडालो. दिग्गजांच्या अभंगांची व्हर्शन्स? पं. भीमसेनजींच्या अभंगांची? ‘गाणार कोण?..’ ती गाणी रसिकांच्या काळजावर कोरली गेलीत. कुणा पाणचट आवाजात पेशकश झाली ना तर खैर नाही आपली. (आदल्या वर्षी शिकार, पुढल्या वर्षी भिकार?!) बजेटची काळजी नव्हती हो, पण असलं अश्लाघ्य वर्तन करायला मन धजावत नव्हतं. त्या काळात रीमिक्सचं फॅड नुकतंच आलेलं. अभंगांचं ‘रीमिक्स’ करण्याचा प्रस्ताव घेऊन कुणा मंत्र्यांच्या वशिल्याचं तट्टू असलेला एक दीड-शहाणा म्युझिक-कॉन्ट्रॅक्टर उपटला. डायरेक्ट बॉसला भेटला.. त्याने ‘डेमो’ दिलेला. अभंगांना ड्रम्स, कीक वगैरे वेस्टर्न संगीतात गुंफलेलं ऐकून पायाखालची जमिनच सरकली. पुढे तसले अनेक प्रस्ताव येऊ लागले.. एका महाभागाने चक्क ‘विठ्ठल-रुक्मिणीचा पोवाडा’, ‘संत तुकारामांचा पोवाडा’, ‘संत ज्ञानेश्वरांचा पोवाडा’ असे प्रस्ताव आणले होते. त्यांना केराची टोपली दाखवली. अण्णांच्याच एखाद्या शिष्याच्या आवाजात भारतीय वाद्यांचाच वापर करून (अन्-प्लग्ड) नवं सादरीकरण करण्याची कल्पना दृष्टीपथात आली. मी, श्री. वसंत मोरेजी या आमच्या संगीत-संयोजकांना सांगावा धाडला. सुचलेली कल्पना सांगितली. नेहमीप्रमाणे चांगले वादक घ्यायचं ठरवलं. बजेट मंजूर झालं. फतवा निघाला.

याद्या झाल्या. पं. भीमसेनजींची गाणी करायचीत. (कठीण आहे!) अण्णांचे जेवढे म्हणून अल्बम्स प्रकाशित झालेले.. आणले एकदाचे! सगळे अभंग आमच्या लहानपणापासून कानावर पडत होते व तेच ऐकत (तेव्हा चाळीशीत असलेली आमची पिढी) आम्ही मोठे झालो होतो ही वस्तुस्थिती असली तरी त्याचं व्हर्शन करायचं म्हणता अनेकदा व्यवस्थित पारायणं करणं, क्रमप्राप्त होतं. संगीत संयोजक नोटेशन काढायच्या तयारीत पेन सरसावून बसले. कॅसेट वाजू लागली. अभंग ऐकता ऐकता थक्क होत होतो.. बाप रे! काय गायलंय अण्णांनी! इकडे संगीत संयोजकही नोटेशन काढताना दहादा थबकत होते. अनेक जागी त्यांचा हात थरथरताना स्पष्ट दिसत होता. गाणं संपलं की ते शून्यात नजर लावून बसायचे. पाचेक मिनिटं त्याच आश्चर्यमुग्ध अवस्थेत व्यतीत केल्यावर भानावर येत पुन्हा पुढचा अभंग लावला जाई.. ही श्रवणभक्ती बरेच तास सुरूच होती. ते संगीतकार पण मी सर्वसामान्य श्रोता! दोनेक अभंग नीटसे ऐकले असतील. ह्या दोनच अभंग श्रवणात चारी मुंड्या चीत झालो. अण्णांनी ज्या प्रकारे गायलं होतं त्याचा इम्पॅक्ट कानामनावर इतका जबरदस्त झाला की 'बस्स!!' अण्णांच्या अभंगांचं व्हर्शन करणार नाही म्हंजे नाही! पं. भीमसेनजी म्हणजे काय चीज आहे हे इथेच उमगलं. तो 'हँग-ओव्हर', ते भारावलेपण आजही कानामनात कायम वस्तीला आहे. त्यानंतर पं. भीमसेनजींच्या गाण्यांची 'व्हर्शन्स' करण्याच्या भानगडीत न पडता. श्रेष्ठ कीर्तनकार प. पू. बाबामहाराज सातारकर, यांना प्रत्यक्ष भेटून 'कीर्तनाच्या' अल्बम्सचा प्रस्ताव दिला. 'कवणाचे मायबाप कवणाचे गणगोत', 'देह हे काळाचे, धन कुबेराचे' असे 'कीर्तनाचे' अनेक अल्बम्स केले. खास अभंगांचा असा एक अल्बमही बनविला. पंढरपूरच्या वारीतच नव्हे तर ते संपूर्ण महाराष्टात लोकप्रिय झाले, हे विशेष.

भारतरत्न पं. भीमसेनजी (भीमण्णा) यांच्याविषयी आपण बरंच वाचलेलं आणि ऐकलेलं आहे. त्यांच्यावर बरीच पुस्तकही प्रसिध्द झालीत. थक्क करणारं आहे सगळं! उपलब्ध माहितीनुसार त्यांचं संपूर्ण नाव भीमसेन गुरूराज जोशी, त्यांचा जन्म गुरूराज आणि रमाबाई या दांपत्यापोटी धारवाड जिल्ह्यातील 'रोण' या त्यांच्या मावशीच्या गावी झाला. जन्म १९२२ सालच्या रथसप्तमीचा. (४ फेब्रुवारी, १९२२). त्याची जन्म-तिथी रथसप्तमीची असली तरी ते आपला वाढदिवस ४ फेब्रुवारीला साजरा करायचे, हे आपणांस माहीतच आहे. त्यांचे वडिल गुरूराजजी हे एक व्यासंगी संस्कृत भाषिक विद्वान होते. सरकार दरबारी मानमरातब होता. शिक्षकी पेशा होता. तसेच ते गायक व कीर्तनकार होते. भीमसेनजींची आईही सुमधुर भजने म्हणत असे. त्यांचे घराणे हे वंशपरंपरागत ज्योतिषी होते. त्यांच्या एकूण अकरा मुलांपैकी सर्वात ज्येष्ठ, ते आपले पं. भीमसेनजी. त्यांच्या आईच्या गळ्यातून ऐकायला मिळालेली कानडी भजने हा भीमसेनजींच्या बाल-गळ्यावर झालेला पहिला संस्कार. गाण्याची आवड ही इथेच निर्माण झाली. घरात भावंडांचा गोतावळा असल्याने भीमसेनजी त्यांच्यापासून

थोडंसं अलिप्त राहून घराजवळच्या ग्रामोफोनच्या रेकॉर्डस् विकणाऱ्याच्या दुकानात तासनतास बसत असत. हा दुकानदार नवीन रेकॉर्ड आली की ती सतत जाहिरातीसारखी वाजवायचा. गाणं हेच आपलं जीवन, संगीत हाच आपला श्वास आहे, आपल्याला आता त्याचीच गोडी लागलीय हे त्यांना बालवयातच उमगलं. अनेक दिग्गजांनी गायलेली गाणी तबकडीवर ऐकत तोंडपाठ करून ती पुनःपुन्हा गायचा सपाटाच लावला. परिचितात कौतुक होऊ लागलं. दुकानदाराकडे येणाऱ्यांच्या गप्पांमधून बुजुर्ग व नामांकित गायकांबद्दल बरंच काही ऐकायला मिळे. १९३२ साली 'किराणा' घराण्यावे उस्ताद अब्दुल करीम खाँसाहेबांची 'पिया बिन नाही आवत चैन..' ही 'झिंझोटी' रागातली ठुमरीची तसेच ध्वनिमुद्रिका ऐकली आणि त्यांच्या गायकीने भीमसेनजींना अक्षरशः वेड लावलं. नंतर पं. सवाई गंधर्व (रामचंद्र गणेश कुंदगोळकर) यांची 'कुंदगोळ' मधली मैफल (१९३३) ऐकताच त्यांनी शास्त्रीय संगीत शिकण्याचा ध्यासच घेतला. याच वयाच्या अकराव्या वर्षीच त्यांनी एका किरकोळ कारणासाठी रागावून घर सोडलं, परंतु काही दिवसातच ते घरी परतले. आपल्या ह्या मुलाचं मन संगीतात रमतंय हे बाबांच्या हे लक्षात आलं होतं. त्यांची गाण्याची आत्यंतिक आवड पाहून बाबांनी हार्मोनियम आणून दिला, तसंच त्यांनी, 'रामपूर-सहसवान' घराण्याशी ताल्लुक असलेल्या उस्ताद इनायत हुसैन खाँ (१८४९-१९१९) तसेच उस्ताद मुश्ताक हुसेन खान (१८७८-१९६४) यांचे गदग मधील (त्यांच्या गावातलेच बरं!) एक शिष्य 'अगसरू चन्नप्पा कुर्तकोटी' यांच्याकडे भीमसेनजींना गाण्याची शिकवणी सुरू केली. वर्षभरात सुमारे वीस-एकवीस रागांशी त्यांचा प्राथमिक परिचय झाला खरा, पण सखोल ज्ञानाची आस मात्र लागून राहिली. वडिलांना तो त्यांच्याकडे बराच काळ शिकेल असं वाटलं होतं पण भीमसेनजींच्या मनात काही वेगळंच होतं. त्यांचं मन तिथे रमेचना. ('रामपूर-सहसवान' घराण्यातील गायनाची शैली ही जवळजवळ 'ग्वाल्हेर' घराण्याशी मिळतीजुळती आहे. पण भीमसेनजींना 'किराणा' घराण्याच्या गायकीबद्दल विलक्षण ओढ आणि आसक्ती होती.) आपल्या गळ्यात उस्ताद अब्दुल करीम खाँ वगैरे दिग्गजांसारखं गाणं यायला हवं असा जणू ध्यासच होता. (उस्ताद अब्दुल करीम खाँसाहेबांच्या 'पिया बिन नाही आवत चैन..' या ठुमरीची एक आठवण शेअर करतोय. ही ठुमरी 'यू-टयुब' वर भीमसेनजींच्या आवाजात सुद्धा उपलब्ध आहे. तसंच दत्ता धर्माधिकारींच्या 'पतिव्रता' (१९५९) या चित्रपटातही त्याचा अंर्तभाव केलेला आहे. इथे ही 'ठुमरी' भीमसेनजींनी, लक्ष्मी शंकर यांच्या सोबत गायलीय. राम कदम यांनी संगीतबद्ध केलेल्या या चित्रपटातली सर्वच गाणी श्रवणीय आहेत. 'क्लिक' करा.) तर 'किराणा' घराण्यातील गायकीच्या वेडाने झपाटलेल्या भीमसेनजींनी एके दिवशी, घरात काहीतरी कारण सांगून पलायन केलं. कुठे तर.. थेट धारवाडला पोहोचले. गायनाचार्य पं. गुरूराव देशपांडे यांच्याकडे काही दिवस गुरुकुल पद्धतीने राहिले. नंतर पुण्याहून थेट ग्वाल्हेर गाठलं. कधी उपाशी तर कधी

अर्धपोटी असा तो खडतर काळ होता. त्या काळात ग्वाल्हेर हे ठिकाण संगीत व कलेचं माहेरघर म्हणून ओळखलं जायचं. खिशात छदाम नाही, पाठीवर शिदोरी कसली तर रेकॉर्डस् ऐकून पाठ केलेल्या तोडक्या-मोडक्या बंदिशी. ग्वाल्हेरच्या महाराजांच्या संगीत विद्यालयात कार्यरत असणाऱ्या उस्ताद हाफीज अली खाँसाहेब (१८८८-१९७२) (हे विख्यात सरोदवादक उस्ताद अमजद अली खाँसाहेबांचे वडिल!) यांच्या मेहेरबानीने एका ठिकाणी निवासाची व खाण्याची सोय झाली. या वास्तव्यात 'मारवा' रागाची तालीम मिळाली, तर कृष्णराव पंडित, कुंडलगुरू बाळाभाऊ उमडेकर व राजाभैया पूँछवाले यांच्याकडच्या श्रवणभक्तीतून गायनाचे मुलभूत संस्कार लाभले. नंतर उस्ताद गंजड खांसाहेबांच्या घरात गुरूकुल पध्दतीनं शिकताना त्यांच्या घरात राब राब राबून थोडी विद्या हासिल केली. नंतर राजाभैयांच्या सूचनेनुसार त्यांनी खडकपूरला प्रयाण केलं. इथल्या केशवराव लुखे, विश्मदेव चटर्जी यांच्याकडे काही काळ ते गुरूकुल पद्धतीने राहिले खरे पण ते वास्तव्य काहीसे निष्फळ ठरले. पुढे कलकत्त्याला (आताचे कोलकाता) न्यू थिएटर्सच्या पहाडी सन्याल यांच्याशी परिचय झाला. त्यांच्याही सानिध्यात संगीताचे धडे गिरवले. त्यांच्याकडून त्यांना 'गांधारी' हा अनवट राग शिकायला मिळाला. काहीही केल्या एकाग्रता येईना. मन रमेना. ह्या गुरूंच्या व्यस्त दिनचर्येमुळे साधनेत खंडही पडू लागला होता. पहाडी सन्यालने त्यांना चक्क सिनेमात प्रयत्न करा असा सल्लाही दिला होता. अण्णांना तो पटला नाही. त्यांनी सरळ जालंदर गाठलं. तिथल्या आर्य संगीत विद्यालयाचे अंधचालक (त्या काळातले सुप्रसिध्द ध्रुपद गायक) धृपदिए मंगतराम यांच्याकडे 'धृपद' संगीताची तालीम मिळाली. त्यांच्याकडे काही काळ शे-दिडशे ध्रुपदं शिकले. तेव्हा त्यांना निपुत्रिक असलेल्या एका मिल-मालकाने आश्रय दिलेला. भीमसेनजींना त्यांनी पोटच्या मुलाप्रमाणे वागवलं. पहेलवानी खुराक आणि गाणं असा दिनक्रम. त्यामुळे तब्येत सुधारली. जालंदरमध्ये 'हरी वल्लभका मेला' नामक संगीत संमेलन व्हायचं. नामांकित गायकांची मांदियाळी भरायची. आपली सांगीतिक तृष्णा भागवण्यासाठी देशभरातून लोक तिथे हजेरी लावायचे. भीमसेनजी तानपूरा घेऊन काहींची साथसंगत करायचे. ह्याच संगीत संमेलनात त्यांची गाठ पडली ती पं. विनायकबुवा पटवर्धनजींची. त्यांनी भीमसेनजींची आस्थेनं विचारपूस केली. तो गाणं शिकायला दूर जालंदरला आलेला पाहून बुचकळ्यात पडले.. 'गाणं शिकायला तू इतक्या दूरवर आलायस? अरे तुझ्या गावाजवळच कुंदगोळला संगीतातली एक महान व्यक्ती राहते.. उस्ताद अब्दुल करीम खाँसाहेबांचेच शिष्य आहेत ते.. सवाई गंधर्व त्यांचं नाव.. त्यांच्याकडेच जा तू..' भीमसेनजी त्यांच्याकडे पाहतच राहिले. काखेत कळसा आणि गावाला वळसा म्हणतात ना तसंच वाटलं भीमसेनजींना. अण्णा तडक घरी परतले. आपल्या चुलत आजोबांच्या विश्वनाथ महाशब्दे नावाच्या मित्राबरोबर ते कर्नाटकातल्या कुंदगोळ गावी गेले आणि त्यांनी पं. रामभाऊ कुंदगोळकर अर्थात सवाई गंधर्व यांचा गंडा बांधला. नंतर १९३६

ते १९४० या कालखंडात आपल्या या गुरुगृही राहून कठोर संगीतसाधना केली. घरात पाणी भरण्यापासूनची सर्व कामं करावी लागायची. कळीचं फूल बनण्याच्या अवस्थेत म्हणजेच तरूणाईत प्रवेशतानाच जालंदरच्या आश्रयदात्यांच्या मेहेरबानीमुळे योग्य वेळी पहेलवानी खुराक मिळाल्यामुळे शरीर धडधाकट होतं. गुरुंच्या घरची कामं म्हणूनच हलकी झाली, हे सुदैव! पण वयाच्या चौदाव्या वर्षात पदार्पण केल्यामुळे आवाज फुटला. त्यामुळे या काळात त्यांना आवाजावर जास्त मेहनत घ्यावी लागली. सतत रियाज करावा लागत असे. श्रवणभक्ती केल्यानेच की काय  अण्णांना संगीतसागरातले मोती वेचायला मिळाले. गुरुभगिनी डॉ. गंगुबाई हनगळ, गुरुबंधू नाडगीर, पं. मल्लिकार्जुन मन्सूर, सुरेशबाबू माने यांचे गायन ऐकायला मिळाले. सवाई गंर्धवांकडे त्यांनी निरलसपणे गुरुसेवा करून व अतिशय कष्टाने गानविद्या संपादन केली. गंधर्वांनी नंतर पुढच्या शिक्षणाला अचानक नकार दिल्याने ते काहीसे हताश झाले होते. पण त्यांनी जिद्द करून रामपूर संस्थानातील उस्ताद मुश्ताक हुसेन खाँसाहेबाकडे आश्रय घेतला. तिथल्या वर्षभराच्या वास्तव्यात 'नटमल्हार' घोटला. एकदा सवाई गंधर्वांनी त्यांना बोलवलंय असा संदेश मिळाला. त्यांच्याकडे तोडी, मुलतानी व पूरिया या फक्त तीन रागांचा चक्क तीन वर्षे सराव सुरु होता. पूरिया, पूरिया धनश्री, तोडी, नटमल्हार, आसावरी व भैरवी या रागांचा गंधर्वानी केलेला रियाज ऐकून भीमसेनजींच्या आवाजावर पैलू पडले असं दस्तुरखुद्द भीमसेनजी सांगत. गायनातील काळाचे अचूक भान व घराण्याच्या शिस्तीचे धडे मिळाले. मंद्र व तारसप्तकात आपला आवाज सहज संचार करावा म्हणून अण्णांनी दिवसाकाठी अक्षरशः चौदा चौदा तास अथक मेहनगत घेतली, यामुळेच प्रसन्न होऊन गंधर्वांनी त्यांना उदारहस्ते गानविद्या दिली. गंधर्वांच्या सतत होणाऱ्या मैफिली ऐकून, मैफिलीच्या गाण्यांचे नेमके नियोजन कसं करायचं, रसिक-श्रोत्यांच्या आवडीनुसार कोणत्या रागांची व गानप्रकारांची निवड करावी, या गोष्टी भीमसेनजींनी आत्मसात केल्या. मध्यंतरी १९४४ साली विक्रमादित्य संगीत समारोह झाला होता. मुंबईत झालेल्या या समारंभाच्या निमित्ताने त्यांची खाँसाहेब बडे गुलाम अली खाँ, कुमार गंधर्वजी आणि पु. ल. देशपांडेसाहेबांशी परिचय झाला व त्याचं रूपांतर स्नेहात झालं. (पं.भीमसेनजीचा पहिला विवाह (१९४३) 'सुनंदा कट्टी' या त्यांच्या मामेबहिणीशी झाला होता. आणि दुसरा विवाह (१९५१) त्यांनी नागपूर येथील 'वत्सला मुधोळकर' यांच्याशी केला.) सुदैवाने  १९४६ साली गुरु सवाई गंधर्वजींच्या षष्ट्यब्दीपूर्ती समारोहात गुरुंनी त्यांना गाण्याची परवानगी दिली. अण्णांनी एक बंदीश आणि, उप-शास्त्रीय चीज म्हणून एक नाट्यसंगीत पेश केलं. या व्यासपीठावरूनच संगीतातल्या क्षितिजावर खऱ्या अर्थाने ह्या 'स्वरभास्कराचा' उदय झाला.

यानंतर भीमसेनजी 'लखनौ आकाशवाणी केंद्राचे' मान्यताप्राप्त कलावंत झाल्यामुळे त्यांच्या चरितार्थाचा प्रश्न सुटला. आयुष्याने एक नवं व वेगळं वळण घेतलं. आयुष्याला स्थैर आलं. मानसिकता स्थिर झाली.

'लखनौ आकाशवाणी केंद्रात' त्यांना दिग्गज थिरकवा साहेबांचा तबला, उस्ताद निस्सार खाँसाहेबांचे वडील उस्ताद फिदा हुसैन खाँसाहेब यांचे गाणे मनसोक्त अभ्यासायला मिळालं. तसंच बेग़म अख़्तर (१९१४-१९७४), व्ही. जी. जोग (१९२२-२००४), पं. के. जी. गिंडे (१९२५-१९९४), बलवंत राय भट्ट (१९२१-२०१६), श्रीकृष्ण नारायण रातंजनकर (१८९९-१९७४), रसूलनबाई (१९०२-१९७४) या शास्त्रीय संगीत क्षेत्रातील दिग्गज प्रभृतींशी रुबरू परिचय झाला. ऋणानुबंधही जुळले. उस्ताद बिस्मिला खाँसाहेबांशी तर स्नेहच जडला. काही काळातच ते 'मुंबई' व 'निजाम' या रेडिओ केंद्राशी जोडले गेले. त्यांना गायनाची असंख्य निमंत्रणे आल्यानंतर मैफिलींचे नेमके तंत्र अवगत झाले.. आणि जीवनाला एक सुखद अशी कलाटणी मिळाली. कलकत्त्यात झालेल्या 'एंटाली संगीत महोत्सवात' (१९५३) त्यांनी सादर केलेल्या गायनकलेला बंगाली रसिकांनी अगदी भरभरून दाद दिली. आता भीमसेनजींची कीर्ती आपल्या देशातच नव्हे तर परदेशातही वाखाणली जाऊ लागली. त्यांच्या मैफिलींना सर्वत्र अमाप लोकप्रियता लाभली. यातून झालं काय? तर.. आर्थिक सुबत्तेबरोबरच अनेक मानसन्मानही मिळू लागले. खरं सांगायचं तर, गुरु सवाई गंधर्वांची मूळची स्वरप्रधान, आक्रमक अशी आलापचारींची गायकी भीमसेनजींनी अधिकच आक्रमक, गतीमान आणि श्रोत्यांच्या मनाची पकड घेणारी ठरली. भीमसेनजींच्या गायकीतील याच वैशिष्टयांमुळे ते संगीताच्या इतिहासात एक अजरामर व्यक्तिमत्त्व ठरले. हे सगळं थक्क करणारंच आहे ना!

गाणं किंवा चीज आळवणं म्हणजे काम उरकणं नसतं. मिळालेले शब्द, दिलेल्या चालीत स्वरयंत्राव्दारे उच्चारणं एवढं सोपं काम नसतं, अनेक सन्माननीय व ज्येष्ठ संगीततज्ज्ञांकडून आपण सततच ऐकलंय. ते. गाणं नुसतंच डोक्यात असून चालत नाही. (आमच्या कंपनीच्या 'ब्ल्यू-डायमंड' या स्टुडिओतल्या माईकवर, भल्याभल्यांची पिवळी होताना मी प्रत्यक्ष पहिलंय.) दिलो दिमागसे ते गळ्यातून कसं उतरेल हीच कसोटी असते गायकाची! शेवटी सारी मदार असते ती त्याच्या गळ्यावर. डोक्यात असलेलं, ताकदीनं गळ्यातून उतरवावं लागतं. माईकचाही सेन्स असावा लागतो. पं. भीमसेनजींच्या गळ्यावर विधात्याने अनेक गुणांची वैपुल्याने खैरात केलेली असावी. या दैवी गुणांच्या साथीला अथक, अपरंपार अशा रियाजाची जोड तसेच प्रखर आत्मविश्वास असल्यामुळेच की काय ते आपली मैफल जिंकायचेच. आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण, दमदार फिरत, दमसास आणि गायकीतली त्यांची ती ऐट वाखाणण्यासारखीच! अण्णा आपली पेशकश करताच त्यांच्या अटक नसलेल्या रसपरिपोषक गायकीतून मैफिलीत समोर बसलेला श्रोता दंगच होऊन जाई. श्रवणानंदातले झपाटलेपण, भारावलेपण म्हणतात ना तसं काहीतरी. सकारात्मक कंपनं, चैतन्यमय उर्जा! 'मॅग्नेटिक अफेक्शन'! जणू काही त्या आवाजाने नजरबंदी होतेय की काय असा आश्चर्यकारक अनुभव! हॅलोजनसारखा

प्रखर प्रकाशझोत चहूबाजूंनी अंगावर यावा अशी अनुभूती! दाही दिशा व्यापून उरेल असा स्वर! आसमंतात भरून राहिल्यासारखा धीरगंभीर आवाज! समोरच्या श्रोतेमंडळींवर स्वरांचे गारूड घालून सत्ता मिळवणारा हा शहेनशाह. आवाजाची जातकुळी म्हणाल तर अस्सल पुरुषी. मर्दानी! किराणा घराण्याची गायकी म्हणजे अनुनासिक, बारीक, टोकदार आणि उंच पट्टी हा तथाकथित समज खोटा ठरवणारी. पं. भीमसेनजींचा आवाज हा इश्वरी स्पर्श झालेला, रुंद, पल्लेदार, गोडवा असलेला.. पण पीळदार! का कोण जाणे, अण्णांच्या गायकीतले काही गुण, काही बारकावे तर थेट पतियाळा घराण्याशी ताल्लुक असणाऱ्या खाँसाहेब बडे गुलाम अली खाँ यांच्या गाण्यातले आहेत की काय असा संभ्रम पडायचा. सारंच चमत्कारीक. एक चीज ऐकून होतेय.. त्याचा भर ओसरतोय न ओसरतोय तोच अण्णा पुढे काय ऐकवणार आहेत ही उत्कंठा शिगेला पोहोचायची. चमत्कृतीचा धक्का! कानामनावर 'हँग-ओव्हर' असतानाच दुसऱ्या चीजेने स्तिमित केलंय. हे भारावलेपण कित्येक रसिकांनी अनुभवलं आहे. अण्णांना मैफिलींचा बादशाह म्हणतात ते काही खोटे नाही. काही गायक स्वतःची अशी चाकोरी बनवतात, चौकट बनवतात आणि त्यातच अडकून पडतात पण अण्णा अशा तथाकथित चौकटीत अडकलेच नाहीत. त्यांनी आपल्या गायकीवर संस्कार करत प्रयत्नपूर्वक उत्तुंग स्वरलेणी चढवली. त्यांच्या मराठी उच्चारात काहीशी कानडी झाक आहे, कबूल! गाण्यातल्या काही जागा, ताना, हरकती तर अक्षरशः कर्नाटकी लकबीने येताना जाणवतात. पण त्यात आपलेपणा जाणवतो, गोडवा जाणवतो! हे मात्र नक्की! त्यात स्वराचं सच्चेपण जाणवतं. शास्त्रीय संगीतात अनेक राग आहेत व शास्त्रीय  गायक ते आपापल्या पध्दतीनं गातात हे जरी खरं असलं तरी पं. भीमसेनजींचं काही रागांवर भलतंच प्रभुत्व होतं. अमुक रागांवर त्यांचा स्वतःचा असा ठसा होता. ललत, भटियार, मियाँ की तोडी, दरबारी कानडा, कलाश्री, पुरीया कल्याण आणि सदासुहागन भैरवीवर अण्णांची वेगळी अशी जबरदस्त छाप असायची. अण्णांनी अनेक नव्या रागांची निर्मिती केली. ललत, भटियार, हिन्डोलिता आणि कलाश्री हे त्यापैकी काही अजरामर झालेले राग.

पं. भीमसेनजींच्या गायकीतल्या काही गोष्टी नक्कीच अभ्यास करण्याजोग्या आहेत. त्यांनी सादर केलेले आविष्कार नव्या गायकांसाठी खचितच मार्गदर्शन करणारे आहेत. 'पं. भीमसेन' हे नवं घराणं उदयास यावं इतकी त्यात ताकद आहे. शास्त्रीय संगीत हे इतकं मोठं एव्हरेस्ट शिखर, त्याचा आवाका इतका प्रचंड की आपणा सर्वसामान्यांचे हात तिथवर पोहोचणं म्हणजे कठीणच काम. पण भीमसेनजींनी आपल्या अभंग-गायकीतून असा काही करिष्मा केला की अभंगांच्या रूपातून नकळत शास्त्रीय संगीत आपणा सर्वसामान्यांच्या घराघरात पोहोचलं.. रुजलं.. वाढलं. आणि याच पुण्याईवर की काय अशा प्रकारातले अभंग, भक्तिगीतं

वटवृक्षाइतकी फोफावली. पं. भीमसेनजींच्या अभंग गायकीतली प्रासादिकता, आर्तता तसेच इश्वराचरणी समर्पित होणारी भावना मनाला न स्पर्शेल तर नवलच.

असं वाचनात आलंय, की एखादे 'संगीत घराणे' बनताना निदान तीनेक पिढ्यांचे तरी सातत्य लागते आणि मुख्य म्हणजे तसे असल्याखेरीज 'घराणे' असा शब्दच वापरला जात नाही. पहिल्यानंतर दुसऱ्या आणि त्यानंतरच्या तिसऱ्या पिढीतल्याने आपल्या घराण्याशी ताल्लुक असलेली गायकी तर शिकायचीच पण आपल्या अंगभूत कौशल्याने त्यात नवनवोन्मेषशाली प्रयोग करायचे, भर घालायची! उस्ताद अब्दुल करीम खाँ यांच्या घराण्याची पं. सुरेशबाबू माने, पं. सवाई गंधर्व आणि गानहिरा श्रीमती हिराबाई बडोदेकर ही दुसरी पिढी तर डॉ. गंगुबाई हनगल, पं. भीमसेनजी आणि पं. फिरोज दस्तुर ही तिसरी पिढी. उस्ताद अब्दुल करीम खाँसाहेब, त्यांचे शिष्य पं. सवाई गंधर्व आणि नंतर त्यांच्या नक्श-ए-कदमवर जाऊनही स्वतःची अशी स्वतंत्र ओळख निर्माण करणारे आपले भारतरत्न स्वरभास्कर पं. भीमसेनजी जोशी! सवाई गंधर्वांनी स्वतःची गायकी समृध्द करण्यासाठी अनेक घराण्याच्या तालमीचा व संस्काराचा पुरस्कार केला होता. त्यांच्या गायकीवर किराणा घराण्याबरोबरच ग्वाल्हेर घराण्याच्या खाँसाहेब निसार हुसैन खाँ व चतुरस्त्र पं. भास्करबुवा बखले (ग्वाल्हेर, आग्रा, जयपूर) यांचाही पगडा होता, असे जाणकार सांगतात. सवाई गंधर्वांनी आपल्या या शिष्योत्तमाला आपल्या किराणा घराण्यातल्या गायकीसह इतरही सगळे नीरक्षीरविवेक शिकवले होते. गायकाला 'घराणं' असं हे हवंच असतं. त्याशिवाय त्याला लोकमान्यता मिळत नाही. पण चाकोरीबध्द गाणं किंवा गुरूने जे जे शिकवलंय तेवढंच जर लोकांपुढे मांडलं तर ती पोपटपंची होते अशा मताचे पं. सवाई गंधर्वजी होते. पं. भीमसेनजींनी पुढे आपल्या 'किराणा' घराण्याची ध्वजा आसेतुहिमालय फडकवत ठेवली होती, यात वादच नाही पण त्यांनी एकाच चाकोरीतच न गुंतता, चौकस, चौफेर नजरेने वेगवेगळ्या घराण्यातल्या गायकीचे गुण डोळसपणे ऐकून त्याचा स्वतःच्या गायकीत बेधडकपणे समावेश केला हे विशेष! खरं तर ही बगावतखोरी असेलही.. पण त्यांच्या करदार, भरदार आवाजाचं खरंखुरं कर्णमधुर असं रूप सामोरं येताच रसिक भारवले. अभंगगायकीने तर ते आमच्यासारख्या सर्वसामान्यांच्या गळ्यातले ताईतही बनले.

१२ सप्टेंबर १९५२ या दिवशी अण्णांचे गुरू सवाई गंधर्वजी यांचा स्वर्गवास झाला. पं. भीमसेनजी यांना मानसिकरित्या खचलेलं निकटवर्तियांनी पाहिलंय. ते अबोल झाले होते. तो धक्का सहन करण्यापलिकडचा होता. नंतर स्वतःला काहीसं सावरत त्यांच्या पहिल्या पुण्यतिथीनिमित्त अण्णांनी 'सवाई गंधर्व संगीत सोहळा' आयोजित केला. हा सोहळा आज जगभरात सुप्रसिध्द झाला आहे, हे आपण जाणताच!. शास्त्रीय संगीतातील

जवळजवळ सर्वच मातब्बरांनी इथे हजेरी लावलीय हे विशेष! नव्या कलावंतांसाठी हे हक्काचं व्यासपीठ झालं आहे हे काय मी सांगायला हवंय??

१९६८ ते १९७५ सालापर्यंत अण्णांनी गायिलेल्या अभंगांचं कुबेरधन आपल्यासारख्या सर्वसामान्यांसाठी अनमोल ठेवा आहे. त्यांच्या आवाजातूनच तर संतवाङ्मय आपल्या सर्वसामान्यांच्या घरात अभंगांच्या रूपाने नांदू लागलंय. अनेक रसिक श्रोत्यांच्या घरची सकाळ ही.. ('यू-ट्यूब', 'अलेक्सा' अशा माध्यमातून का होईना!) पं. भीमसेनजींच्या गाण्यांनी साजरी होत असते. (यात माझंही घर आहे, बरं का?)

पं. भीमसेनजींची गाणी ऐकत, कानात साठवतच आपण मोठे झालो, होय ना! पं. भीमसेनजीची मैफल म्हणजे रसिकांना पर्वणीच असते असं ऐकून होतो. पण योग येतच नव्हता. आमच्या कंपनीसाठी त्यांचा शास्त्रीय गायनाचा अल्बम करताना प्रत्यक्ष भेटीचा योग आला. देखण्या चेहऱ्याचे (मस्त.. दिलखुलास पिताजी, नातवंडांचे लाडके आजोबा असल्यागत मी मुलाखत घेतली.).. मुलाखत देताना, आपल्या संगीत क्षेत्रातील मोठेपणाचा दिखावा न करता, आपण भारतातील एक सवौच्च सेलेब्रिटी' आहोत.. याचा यत्किंचितही गर्व नव्हता. कसलाही 'प्रोटोकॉल' न पाळता.. त्यांनी मला अगदी आपलेपणाने दिलखुलास मुलाखत दिली. नंतर काही दिवसांनी सुदैवाने मला.. पं. भीमसेनजी यांची एक मैफल ऐकण्याची आयती संधी मिळाली. बुजुर्ग पं. भीमसेनजी अंतःकरणापासून गात होते. पण वयोमानामुळे सादरीकरण करताना आपला चेहरा वेडावाकडा करून गळ्याचे स्नायू पिळवटून पिळवटून ते गातायत हे पाहता चलबिचल झाली मनाची.. मात्र कानावर पडणारे सूर इतके सच्चे होते की तो दिवस आमच्यासाठी आठवणींच्या कुपीत कायम बंदिस्त करण्याइतका लाजवाब ठरला.

आपल्या भीमसेनजींनी 'धन्य ते गायनीकळा' (भाग १ व २ - १९६९) या नाटकाचे संगीत दिग्दर्शन केले होते. गुळाचा गणपती, बसंतबहार, भैरवी, पतिव्रता, स्वयंवर झाले सीतेचे या चित्रपटांसाठी त्यांनी पार्श्वगायन केले होते. 'संतवाणी' या अभंगाचा व 'रंगवाणी' या नाटयसंगीताचा आविष्कार अभ्यास करण्याजोगा आहे. सुप्रसिद्ध बालमुरलीकृष्णन या दाक्षिणात्य संगीततज्ज्ञांसोबतची जुगलबंदी, स्वरसम्राज्ञी लतादीदींबरोबरचा अल्बम, भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवात (१९९७) संसदेत सादर केलेलं 'वंदे मातरम्', व 'मिले सूर मेरा तुम्हारा' या अशोक पत्कींच्या संगीत-दिग्दर्शनातील या राष्ट्रैक्याच्या बहुभाषिक गीतातील प्रमुख सहभाग अशी त्यांची गानविविधता आहे.

पंडितजींना, भारत सरकारकडून पद्मश्री (१९७२), पद्मभूषण (१९८५), पद्मविभूषण (१९९९) तर दि. ४ नोव्हेंबर, २००८ रोजी त्यांना भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान असलेल्या 'भारतरत्न' या पुरस्काराने गौरविण्यात आले होते. याव्यतिरिक्त संगीतरत्न (१९७१), संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार (१९७६)

इत्यादी सन्मान त्यांना लाभले होते. गंधर्व महाविद्यालयाने (जयपूर) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गुलबर्गा विद्यापीठ, लोकमान्य टिळक महाराष्ट्र विद्यापीठ यांनी त्यांना सन्मान्य 'डी.-लिट' पदवी प्रदान केली. इतर पुरस्कारांमध्ये 'महाराष्ट्र-भूषण पुरस्कार', 'पुण्यभूषण पुरस्कार', 'स्वरभास्कर पुरस्कार', 'तानसेन पुरस्कार' यांचा अंतर्भाव आहे. जेम्स वेबरीज, कवि गुलजार यांनी त्यांच्या जीवनावर 'लघुपट' बनविले आहेत.

'मिले सूर मेरा तुम्हारा..' च्या उल्लेखाशिवाय 'पितृतुल्य आणि सन्माननीय पं. भीमसेनजीं' बद्दलचा लेख अपूर्णच नाही का? १५ ऑगस्ट, १९८८ रोजी प्रदर्शित झालेले, भारतीय एकात्मतेवर आधारित असे हे 'व्हिडिओ' सादरीकरण आहे, हे आपण जाणताच. (सोबतच्या 'प्ले-लिस्ट' मध्ये दिलेल्या लिंक्सवर अवश्य पहा.) भारताचे तत्कालीन पंतप्रधान 'श्री. राजीवजी गांधी' यांच्या मूळ संकल्पनेवर 'भारत सेवा संचार परिषदेने' तयार केलेल्या व 'दूरदर्शन' वरून प्रसारित झालेल्या या 'व्हिडिओ' चे लेखन अझगर खान यांनी केले होते. तर पियुष पांडे यांनी भारतातील चौदा भाषांमध्ये गीतरचना साकारली होती. संगीतकार पं. अशोक पत्की यांचं संगीत आणि लुईस बँक्स यांनी संगीत संरचना/संयोजन केलं होतं. दिग्दर्शन सुरेंद्रनाथ यांचं होतं. या 'व्हिडिओच्या' एकंदर सादरीकरणामध्ये सुरेश मल्लिक, कैलाश सुरेंद्रनाथ यांचंही मोठं योगदान आहे. पंतप्रधानजींच्या भाषणानंतर हा 'व्हिडिओ' प्रसारित करण्यात आला होता. हा 'प्रोजेक्ट' प्रत्यक्षात आकाराला येण्याआधी, ही 'टीम' प्रथमतः पं. भीमसेनजींच्या भेटीला गेले होते आणि त्यांना यामागची एकंदर संकल्पना विषद करून सांगत, बरीच चर्चा केली असल्याचं बुजुर्ग साहित्यिकांकडून समजलं. त्या अलौकिक सादतीकरणातील सन्माननीय प्रभृतींचा नक्कीच उलेख व्हायला हवा. पं. भीमसेनजी जोशी, पं. एम. बालमुरलीकृष्णन, लतादीदी, कविता कृष्णमूर्ती, शुभांगी बोस, आर. ए. राममणि, आणि सुचित्रा मित्रा यांच्या सुरेल आवाजात, हे 'उत्तुंग स्वरशिल्प' साकारलं गेलं. यात अमिताभ बच्चन, जितेंद्र, मिथुन, कमल हासन, वहिदा रहमान, विजया, दीपा साही, दीना पाठक, ओम पुरी, तनुजा, शबाना आजमी, हेमामालिनी, रेवती, शर्मिला टागोर, मिनाक्षी शेषाद्री, मल्लिका साराभाई आणि जावेद अख्तरजी यांसारख्या 'कलावंतांचा' तर प्रकाश पडुकोन, नरेंद्र हिरवानी, वेंकट राघवन, सईद किरमानी, अरूण लाल, रामनाथ कृष्णन, लेस्ली लुईस, गुरूबक्ष सिंग अशा अनेक मान्यवरांचा या 'व्हिडिओ' मध्ये सहभाग होता. थोड्याच काळात या अनुमप सादरीकरणाला भारतभर प्रचंड लोकप्रियता लाभली.


३० नोव्हेंबर, १९९६ रोजी 'दैनिक सामनाच्या - फुलोरा पुरवणीमध्ये' माझा 'स्वरभास्कर पं. भीमसेनजी जोशीसाहेबांवरील' माझा प्रदीर्घ लेख प्रकाशित झाला होता. त्यात सर्व रसिकांच्या वतीने, एक सर्वसामान्य श्रोता म्हणून मी लिहिलं होतं.. 'जीवेत शरदः शतम्..!!' पण नियतीला हे मंजूर नव्हतं.. पं.


भीमसेनजी गेले. स्वरभास्कराचा अंत झाला. २४ जानेवारी, २०११ सह्याद्री सुपर स्पेशियालिटी इस्पितळ, डेक्कन जिमखाना, पुणे येथे त्यांनी अखेरचा श्वास घेतला. आज पं. भीमसेनजी आपल्यात नाहीत ही खंत खूपच क्लेशदायी. त्यांच्या महानिर्वाणानंतर त्यांच्यावर बऱ्याच बुजुर्ग लेखकांकडून रकाने भरभरून लिहिलं गेलंय. पण एकच हुंदका दाटून येतोय.. वाटतं..! संगीत क्षेत्रातील आज ज्यांच्या पायांवर नतमस्तक व्हावं असे पाय गेले. कविवर्य विंदा करंदीकरांच्याच शब्दात सांगायचं तर 'अमृताचे डोही। बुडविले तुम्ही, बुडताना आम्ही। धन्य झालो. मीपण संपले। झालों विश्वाकार, स्वरात ओंकार। भेटला गा !!'

© - अनंत पावसकर (ज्येष्ठ पत्रकार आणि संगीत संयोजक)

anantpavaskar@gmail.com ९८२००२२४१७
(दै. सामना - 'फुलोरा पुरवणी' - ३० नोव्हेंबर, १९९६ रोजी प्रथमतः प्रकाशित.)







## स्वरभास्कर भारतरत्न 'पं. भीमसेनजी जोशी' यांना मिळालेले मानसन्मान :

१९७२ - पद्मश्री
१९७६ - संगीत नाटक अकादमी पुरस्कार
१९८५ - पद्मभूषण
१९८५ - सर्वोत्कृष्ट पार्श्वगायनासाठी राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार
१९८६ - पहिली प्लॅटिनम डिस्क
१९९९ - पद्मविभूषण
२००० - आदित्य विक्रम बोर्ला - कलाशिखर पुरस्कार
२००१ - कन्नड विद्यापिठाचा नाडोजा पुरस्कार
२००२ - महाराष्ट्रभूषण
२००३ - केरळ सरकारचा 'स्वाती संगीत पुरस्कारम्'
२००५ - कर्नाटकरत्न
२००८ - भारतरत्न
२००८ - स्वामी हरिदास पुरस्कार
२००९ - दिल्ली सरकारचा 'जीवन गौरव पुरस्कार'
२०१० - राम सेवा मंडळी, बंगळुरू कृत 'एस्. व्ही नारायणस्वामी राष्ट्रीय पुरस्कार'
'पंडित' (श्री रामेश्वर मंदिर, पुणे येथील ब्रह्मवृंदाकडून सन्मानपूर्वक - १९५४)
'उस्ताद बडे गुलाम अली खाँ पुरस्कार' (१ नोव्हेंबर, १९६१)
'गायनाचार्य' - (अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय - १९६४)
'संगीतरत्न' (श्री राघवेंद्रस्वामी पीठाकडून साशीर्वाद - १९७२)
'वज्रदेही' (श्री. बापूजी भंडारी कृत पुरस्कार)
'मियाँ तानसेन पुरस्कार' (फिल्म संगीत उपहार रात्री- ६ मे, १९७४)
'संगीताचार्य' (जयपूर गांधर्व महाविद्यालयातर्फे)
'महामहोपाध्याय' - (अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय - १९८२)
'सर्वोत्तम पार्श्वगायक' (नॅशनल फिल्म फेस्टिवल - १९८५)
'गौरव' - (सुवर्ण महोत्सवानिमित्त) महाराष्ट्र विधान परिषद - जुलै, १९८५
'गौरव' - स्क्रोल ऑफ ऑनर - (हस्ते के. प्रभाकरराव) - २६ जानेवारी, १९८६
'डी. लिट्.' - गुलबर्गा विद्यापीठ - ४ मार्च, १९८६
'संगीत नाट्य अकादमी पुरस्कार', १९८७
'गौरव' - दक्षिणी वार्ता (कोलकाता)
'अभिनंदन पत्र' - कानपूर महानगरपालिका,१५ ऑक्टोबर, १९८९
'महाराष्ट्र गौरव पुरस्कार' - महाराष्ट्र शासन, १९९०
'मियाँ तानसेन पुरस्कार' (तानसेन समारोह - मध्यप्रदेश) - ६ डिसेंबर, १९९१
'डी. लिट्.' - पुणे विद्यापीठ - २७ डिसेंबर, १९९१
'दीनानाथ मंगेशकर पुरस्कार' (दीनानाथ स्मृती प्रतिष्ठान) - १९९२
'देशिकोत्तम' - विश्वभारती, १९९३
'डी. लिट्.' - टिळक महाराष्ट्र विद्यापीठ - १८ डिसेंबर, १९९४
'गौरव' - पुणे महानरगपालिका - ४ फेब्रुवारी, १९९६
'गौरव' - पुणे फेस्टिव्हल -२६ सप्टेंबर, १९९६
'पुण्यभूषण' (पहिलाच पुरस्कार) - त्रिदल संस्था.
(संकलन - अनंत पावसकर)

**भारतरत्न पं. भीमसेनजींची काही सुप्रसिद्ध अभंग आणि भक्तिगीते, जी आपल्या काळजावर कायमची कोरली गेलीयत.. त्यांची खास नामावली. फक्त ‘क्लिक’ करा**

१. माझे माहेर पंढरी..

२. राजस सुकुमार मदनाचा पुतळा..

३. आरंभी वंदिन अयोध्येचा राजा..

४. जाता पंढरीसी, सुख वाटे जीवा..

५. आता कोठे धावे मन..

६. तुका आकाशाएवढा..

७. ज्ञानियांचा राजा गुरूमहाराव..

८. इंद्रायणी काठी देवाची आळंदी.. (गुळाचा गणपती)

९. जे का रंजले गांजले, त्यासी..

१०. काया ही पंढरी, आत्मा हा विठ्ठल..

११. माझा भाव तुझे चरणी..

१२. अधिक देखणे तरी, निरंतर..

१३. कसा मला टाकून गेला राम..

१४. नामाचा गजर, गरजे भीमातीर..

१५. पावलो पंढरी, वैकुंठ भुवन..

१६. पंढरीचा वास, चंद्रभागे स्नान..

१७. पंढरीनिवासा, सख्या पांडुरंगा..

१८. मन हो रामरंगी रंगले..

१९. सावळे सुंदर, रूप मनोहर..

२०. सगुणाची शेज..

२१. सुख अनुपम संतांचे चरणी..

२२. धन्य आजि दिन झाले..

२३. सुखाचे हे नाम आवडीने घ्यावे..

२४. टाळ बोले चिपळीला.. (डॉ. वसंतराव देशपांडेंसोबत)

२५. तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल..

२६. विठ्ठल हा चित्ती..

२७. डोलत डोलत ठमकत चाले..

२८. रात्रंदिन आम्हास युद्धाचा प्रसंग..

२९. ज्याचा सखा हरी त्यावरी..

३०. पंढरीची वारी जयाचिये कुळी..

३१. विठ्ठलाच्या पायी थरारली वीट..

३२. विठ्ठल गीती गावा..

३३. रम्य ही स्वर्गाहुनी लंका.. (स्वयंवर झाले सीतेचे)

३४. पुण्यपर उपकार..

३५. देवासी तो पुरे एक प्रेमभाव..

३६. संपले जीवन, संपली ही गाथा..

३७. आज मोरे मन लाग्यो..

३८. पिया मिलन की आस..

३९. रसिका गाऊ कोणते गीत..

४०. मोरे घर आओ प्रीतम प्यारा..

४१. भज मन राम चरण..

४२. शोधितो राधेला गोपाळ..

४३. पिया बीन नही आवत चैन..

४४. राम प्रभू आधार..

४५. राग जोगिया..

४६ केतकी गुलाब जुही.. (मन्ना डेंसोबत)

४७. रघुवर तुमको मेरी लाज.. (अनकही)

४८. जो भजे हरि को सदा..

४९. तरंगरेलिया करत.. (बिरबल माय ब्रदर)

५०. पंढरीचा राजा उभा..

५१. मिले सूर मेरा तुम्हारा.. (संपूर्ण)

**संगीतकार पं. श्रीनिवासजी खळेसाहेंबांनी संगीतबध्द केलेला 'राम श्याम गुणगान' हा त्यांचा लतादीदीबरोबरचा आल्बमही श्रवणीय.. दोन भारतरत्न गायकांचा हा आविष्कार..**

बाजे रे मुरलिया.. https://youtu.be/GP6dt_qW5qE?si=skSUdi8pd8cZ89oY

नारायण वंदन.. https://youtu.be/HTYEm2Pc_1U?si=Sl18-dVIVmxDfYxf

श्रीराम जय राम.. https://youtu.be/N-gTiZL857Y?si=CBQW2bi-LIDjJweZ


राम के गुणगान.. https://youtu.be/kULNVVphAW4?si=hOdy8kKIlW9u9icb


♥


**पं. भीमसेनजी यांच्या 'यू-ट्युबवर' अनेकाविध 'ऑडिओ व व्हिडिओ' क्लिप्स उपलब्ध आहेत. त्या सर्व 'लिंक्सना' (३२१) एकत्र करून, मस्त बनवलेली ही एक 'प्ले-लिस्ट'!!**


https://youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi952T2d1wqndfk1-Pf0vsHW8&si=0aQ4bGULIRMytiaq


**‘भारतरत्न पं. भीमसेनजी जोशी’ यांचे अल्बमस्.. फोटोवर ‘क्लिक’ करा.**





















WEEKEND CLASSICS
RADIO SHOW
PANDIT
BHIMSEN
JOSHI
SPECIAL



HINDUSTANI
CLASSICAL
BHIMSEN
JOSHI



पंडित भीमसेन जोशी यांचे
टॉप १० अभंग


Brindabani
Sarang
Pt. Bhimsen Joshi



RPG
LOKPRIYA ABHANG
HMV
लोकप्रिय
अभंग
गायक: लता मंगेशकर आणि पं. भीमसेन जोशी
संगीत: श्रीनिवास खळे


Legends
Pandit Bhimsen Joshi



80
UNSUNG
Raga Kaunsi Kanada
PANDIT BHIMSEN JOSHI



अभंगस्वर
भारतरत्न पं. भिमसेन जोशी
Abhangswar
Bharatratna Pt. Bhimsen Joshi



मराठी
Let's Play
Pt Bhimsen Joshi


GARJAT AAYE
(SUR MALHAR)
Pt. Bhimsen Joshi



EMI
भीमसेन जोशी
मराठी अभंग


CARVAAN CLASSIC
RADIO SHOW
Majhe Maher Pandhari
PT. BHIMSEN JOSHI
स्पेशल



Morning Classical
Pt. Bhimsen Joshi
Melodies Khayal



Pandit Bhimsen Joshi
Echoes of Divine Ragas


Best Of
BHIMSEN JOSHI



सर्वोत्तम गीते
स्वरसम्राट
भारतरत्न
पं. भीमसेन जोशी



Eri Aali Piya Bin
PT. BHIMSEN JOSHI
AUDIO SONG


Majhe Mahar Pandhari
-ABHANG
Pt. Bhimsen Joshi



PT. BHIMSEN JOSHI
A Musical Odyssey Through Divine Ragas



१०
प्रसिद्ध भक्ती गीते
Pt. Bhimsen Joshi
4 MILLION+ VIEWS


SOLID GOLD
PANDIT
BHIMSEN JOSHI



Amrit
Truely the best of his performances
Bhimpalasi
Vrindavani Sarang
Bharatratna Pt. Bhimsen Joshi



Classical Vocal
PANDIT
BHIMSEN JOSHI
PANDIT BHIMSEN JOSHI
Raga Miyan Ki Malhar
Raga Puriya Kalyan



।।जाता पंढरीसी।।
अभंगवाणी
पं. भीमसेन जोशी



Bhajans
Pt. Bhimsen Joshi


GAJALELE
ABHANG
VOL-2
गाजलेले
अभंग



Pt. Bhimsen Joshi
Hindusthani Classical Vocal



THE VOICE OF ETERNAL RAGAS
Pt. Bhimsen Joshi



Pride Of
India
PANDIT BHIMSEN JOSHI


HINDUSTANI
CLASSICAL
By Pt. Bhimsen Joshi


Pt. Bhimsen Joshi
yantra



BHARAT RATNA
PANDIT
BHIMSEN
JOSHI
MUSIC
TODAY



THE VERSATILE
Pt. Bhimsen Joshi
MUSIC
TODAY



सुप्रसिद्ध अभंग
पं. भीमसेन जोशी



Platinum
MUSIC
TODAY
PANDIT BHIMSEN JOSHI


१०० सुप्रसिद्ध अभंग



Ram
Bhajans by
Legends


Pt. Bhimsen Joshi
Pt. Jasraj
VOCAL CLASSICAL


Filmsongs by
Pt Bhimsen Joshi


नाट्यसंगीत
पं.भीमसेन जोशी


पं. भीमसेन जोशी
५०
अप्रतिम
गीते


REMEMBERING
PT. BHIMSEN JOSHI
ON HIS BIRTH ANNIVERSARY

♥




♥

Whatsapp: 9987737237 esahity@gmail.com


‘अनंत पावसकर’ यांची प्रकाशित झालेली ही काही‘ई-बुक्स’.. फक्त ‘क्लिक’ करा..




















**For all ‘E-Sahitya’ E-Books.. Visit/Log on https://www.esahity.com**

**© - ‘ई-साहित्य प्रतिष्ठान’**